## <u>फौ.चौ.अर्ज क्र.६९/२०१९, अर्ज निशाणी २६ खालील आदेश</u>

(CNR MHNS160002982019)

०१. अर्ज व त्यावरील जबाब वाचला. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रस्तुतच्या अर्जान्वये गैरअर्जदारांनी अर्जदाराचा उलटतपास घेण्याची तसेच त्यांचा पुरावा देण्याची परवानगी मिळण्यास विनंती केलेली आहे. त्यास अर्जदाराच्या विधीज्ञांनी तीव्र आक्षेप घेतला. परंतु, संचिकेचे अवलोकन केले असता, असे दिसुन येते की, गैरअर्जदारांनी विहीत मुदतीत त्यांचा जबाब दाखल केला नव्हता. तसेच, पुरेशी संधी देवुन देखील अर्जदाराचा उलटतपास न घेतल्याने दि.२६.१०.२०२१ रोजी अर्जदाराचा उलटतपास न घेतल्याने उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानंतर, संधी देवुन देखील गैरअर्जदारांनी त्यांचा पुरावा सादर न केल्याने दि.२५.०२.२०२२ रोजी त्यांचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. प्रस्तुत अर्जात गैरअर्जदारांनी कोरोना महामारीचे कारण नमुद केलेले आहे. प्रकरणाचे स्वरुप बघता व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्येशाने गैरअर्जदारांना अर्जदाराचा उलटतपास घेण्याची तसेच त्यांचा पुरावा देण्याची संधी देणे विधीसंगत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेला वेळाच्या अनुषंगाने खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील आदेश.

### – आदेश –

१. अर्ज निशाणी क्र.२६ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांनी खर्च म्हणून अर्जदारास रू.८००/– (रूपये आठशे फक्त) द्यावे.

SUNIL BABASAHEB WALKE

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.04.05 15:28:20 +0530

दिनांक – ०५.०४.२०२२

(सुनिल बा. वाळके)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
चांदवड.